लोकमत

लोकमत पुणे, मंगळवार, दि. २४ जानेवारी २०१२

प्लास्टिक कचरा रोखणार

# रायगडासाठी अनोखी मोहीम

पुणे। दि. २३ (प्रतिनिधी)

**छत्रपती** शिवाजीमहाराजांनी स्वराज्य जेथून चालविले, त्या ऐतिहासिक रायगड किल्ल्यावर प्लॅस्टिकचा कचरा जास्त होत असल्याचे पाहून तो रोखण्यासाठी अनोखी मोहीम राबविण्यात आली. तेथील रोप वे प्रशासनाने प्लॅस्टिक जमा करण्यासाठी 'निसर्गावर प्रेम करा' सप्ताहाचे आयोजन केले होते.

याअंतर्गत रोप वे प्रशासनाने पाण्याची बाटली विकत घेतल्यानंतर ती पुन्हा आणून दिली तर ४ रुपये आणि इतर कुठलीही पाण्याची प्लॅस्टिकची बाटली आणून दिली तर २ रुपये देण्याचा उपक्रम सुरू केला. पहिल्याच दिवशी याला भरघोस प्रतिसाद मिळाला. आतापर्यंत एकूण ५ हजारांहून अधिक बाटल्या जमा झाल्याची माहिती रोप वेचे कर्नल विजय बेडेकर आणि पाचाड ग्रामपंचायतीचे सरपंच राजेंद्र खातू यांनी दिली.